सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कळंब जि. उस्मानाबाद यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी केदार कि. चौधरी)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४४/२०२६

अशोक गोपाळ वाघमारे,
वय – ६९ वर्षे, धंदा – शेती,
रा. इंदीरा नगर, कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव. .....अर्जदार

–विरुध्द–

कोणीही नाही. .....गैरअर्जदार

–: निशाणी क्र.०१ वरील आदेश :–

सदरचा अर्ज मुंबई विनियमन अधिनियम, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथन थोडक्यात असे आहे की, अर्जदाराचे वडील नामे गोपाळ भाऊराव वाघमारे हे दि. २९/०५/२००२ रोजी मौजे येरमाळा, ता. कळंब येथे मयत झाले आहेत व अर्जदाराची आई नामे कृष्णाबाई गोपाळ वाघमारे ही दिनांक १२/०३/२०१४ रोजी मयत झालेली आहे. अर्जात नमुद वारस अशोक गोपाळ वाघमारे व कुसुम गोपाळराव वाघमारे हे मयताचे मुले असून ते मयताचे कायदेशीर वारस आहेत. मयत गोपाळ भाऊराव वाघमारे व कृष्णाबाई गोपाळ वाघमारे यांना अर्जदार व अर्जात नमुद वारसाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. म्हणून त्यांनी त्यांच्या नावाचा वारस दाखला मिळण्याकरीता विनंती केलेली आहे.

३. अर्जदारांच्या अर्जावरून अर्जातील मागणी संदर्भात कोणाचा काही वाद असल्यास तो मांडण्याची संधी मिळावी म्हणून त्यानुसार सदर जाहीर नोटीस ही दिनांक ०४/०४/२०२६ रोजीच्या 'जनमत सर्वसामान्यांचे' वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली. परंतू, आजतागायत सदर अर्जाबाबत हरकत घेण्यासाठी अथवा म्हणणे मांडण्यासाठी कोणीही व्यक्ती न्यायालयात हजर झालेली नाही. तसेच, कोणीही सदर अर्जास कोणतीही हरकत घेतलेली नाही.

४. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे मयत गोपाळ भाऊराव वाघमारे हे दिनांक २९/०५/२००२ रोजी व कृष्णाबाई गोपाळ वाघमारे ही दिनांक १२/०३/२०१४ रोजी मयत झाले आहेत हे दर्शविणारा मृत्यु दाखला निशाणी क्र. ४ वर दाखल केले आहे तसेच अर्जदार यांनी त्यांचे आधारकार्डांची प्रमाणीत प्रती दाखल केलेल्या आहेत. या सर्व बाबींवरून अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे दिसून येते.

५. अर्जदारा क्र. १ ने प्रकरणात स्वत:चे शपथपत्र निशाणी क्र. १० दाखल करून गोपाळ भाऊराव वाघमारे हे दि. २९/०५/२००२ रोजी व कृष्णाबाई गोपाळ वाघमारे ही दिनांक

१२/०३/२०१४ रोजी मयत झाले असून अर्जदार व अर्जात नमुद वारस हे मयताचे वारस असल्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. उपरोक्त कथनास अभिलेखावरील कागदपत्रांमुळे बळकटी मिळत आहे. अर्जदारांचे शपथेवरील कथन नाकारण्याकरीता कुठलेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही तसेच ते वारस नसल्याबाबत अभिलेखावर कुठलीही हरकत देखील नोंदविण्यात आलेली नाही. अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार व अर्जात नमुद वारस यांना गोपाळ भाऊराव वाघमारे व कृष्णाबाई गोपाळ वाघमारे यांचे वारस घोषीत करण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. अर्जात नमुद वारस अशोक गोपाळ वाघमारे व कुसुम गोपाळराव वाघमारे हे मयत गोपाळ भाऊराव वाघमारे व कृष्णाबाई गोपाळ वाघमारे यांचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचा वारस दाखला नियमानुसार मुद्रांक शुल्क भरल्यावर देण्यात यावा.
२. सिव्हील मॅनुअल प्रकरण – १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारस दाखला/प्रमाणपत्रावर टिप नमुद करावी.

स्वाक्षरीत/–

(केदार के. चौधरी)

दिनांक:– १३/०४/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कळंब

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. Pankaj A. Kshirsagar |
| Court | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Kallam |
| Date | 13-04-2026 |
| Order signed by the Presiding officer on | 13-04-2026 |
| Order uploaded on | 13-04-2026 |